# FIRST APPEAL UNDER SECTION 19(1) OF THE RIGHT TO INFORMATION ACT, 2005

To
**First Appellate Authority (F.A.A.),**
Municipal Secretary, 3rd floor,
Mira-Bhayandar Municipal Corporation.

Receipt No. 146530 ₹ 10/-
146531 ₹ 10/-

मिरा भाईंदर महानगरपालिका
नगरसचिव विभाग
स.प्र./नस./प्र.प.
आवक क्र... 09/2021........
दिनांक:- 22/ 2 /2021

**A. Contact details of applicant:**

| | |
|---|---|
| 1. Name of the Applicant | KRISHNA C. GUPTA ( Satyakaam Foundation ) |
| 2. Address/ Mob: | S/106, Patadiya Complex, Near Bramhadev Temple, Gandhi Nagar, Uttan Road, Bhayandar (West), District - Thane, Maharashtra – 401101.<br>**Mob. No. :** 8424823262, **Email:** kcgupta.1997@gmail.com |

**B. Details about RTI request:**

| | | |
|---|---|---|
| 1. Particulars of the CPIO/SPIO against whose order appeal is preferred : | (a) Name | Shri. Kailash Mhatre |
| | (b) Address | 3rd floor, Office of the Municipal Secretary, M.B.M.C. |
| 2. Date of submission of application : | 12/01/2021 | |
| 3. Brief facts leading to appeal: | Grounds for appeal:-<br>The Public Information Officer (P.I.O.) has provided incomplete information for my R.T.I. application dated 12.01.2021 u/s 6 of the R.T.I. Act 2005. | |
| 4. Prayer or relief sought : | 1.) I request the F.A.A. to issue order to the P.I.O. to furnish me the copies of Letters issued by Mr. Prashant Dalvi's office. He has only provided me the copy of register, whereas I had requested for the copies of letters which are being issued by the office of Leader of House, MBMC. Therefore please give order to the P.I.O. to provide me all information sought Free of Cost within period of 07 days. | |
| 5. Copies of documents relied upon by the applicant : | Xerox copy of RTI application | |

Date: 22/02/2021

Signature of the Applicant,

KRISHNA C. GUPTA

For
22/2/21

# मिरा भाईंदर महानगरपालिका

स्व. इंदिरा गांधी भवन, मुख्य कार्यालय,
छत्रपती शिवाजी महाराज मार्ग, भाईंदर (प.) ता.जि. ठाणे 401 101
नगरसचिव विभाग

जा.क्र.मनपा/सचिव/अपिल/ 07 /2021 दिनांक :- 30 / 3 /2021

प्रति,
श्री. कृष्णा सी. गुप्ता
शॉप 106/सी, पटाडीया कॉम्पलेक्स,
उत्तन रोड, गांधी नगर, जनार्दन रकवी मार्ग,
भाईंदर (प.)

विषय :- <u>केंद्र शासनाचा माहितीचा अधिकार 2005 अंतर्गत प्रथम अपिल.</u>
श्री. प्रशांत दळवी, सभागृहनेता यांचे दालनातुन अग्रेषित केलेल्या पत्रांच्या प्रती मिळणेबाबत.

संदर्भ :- आपणांकडील दि. 22/02/2021 रोजीचा अपिलीय अर्ज.

महोदय,

उपरोक्त विषयांन्वये आपण माहिती अधिकार नियम 2005 अंतर्गत दि. 12/01/2021 रोजी दाखल केलेल्या अर्जानुसार श्री. प्रशांत दळवी, सभागृहनेता यांचे दालनातुन अग्रेषित केलेल्या पत्रांच्या प्रती आपणांस न दिल्याचे कळवून संदर्भित अपिल दाखल केलेले आहे.

आपण दाखल केलेल्या अपिलीय अर्जावर दि. 06/04/2021 रोजी सकाळी 11.00 वाजता मिरा भाईंदर महानगरपालिका मुख्य कार्यालय, तिसरा मजला, नगरसचिव दालन येथे सुनावणी आयोजित करण्यात आलेली आहे. तरी सदर सुनावणीच्या वेळी आपण उपस्थित रहावे ही विनंती.

(वासुदेव शिरवळकर)
अपिलीय अधिकारी तथा नगरसचिव
मिरा भाईंदर महानगरपालिका

प्रत माहितीस्तव :-
जनमाहिती अधिकारी तथा लिपीक
नगरसचिव विभाग, मिरा भाईंदर महानगरपालिका

# मिरा भाईंदर महानगरपालिका

स्व. इंदिरा गांधी भवन, मुख्य कार्यालय,
छत्रपती शिवाजी महाराज मार्ग, भाईंदर (प.) ता.जि. ठाणे 401 101
नगरसचिव विभाग

जा.क्र.मनपा/सचिव/अपिल/ 09 /2020-21 दिनांक :- 24 / 2 /2021

प्रति,
लिपीक,
सभागृहनेता दालन,
मिरा भाईंदर महानगरपालिका

विषय :- <u>केंद्र शासनाचा माहितीचा अधिकारी 2005.</u>
सभागृहनेता दालनातील जावक पत्रांच्या प्रती मिळणेबाबत.

संदर्भ :- श्री. कृष्णा सी. गुप्ता यांचेकडील दि. 22/02/2021 रोजीचे प्रथम अपिल.

महोदया,

उपरोक्त् विषयान्वये सभागृहनेता दालनातील जावक पत्रांच्या प्रती प्राप्त न झाल्याने श्री, कृष्णा गुप्ता यांनी संदर्भित प्रथम अपिल दाखल केले आहे. तरी अपिलकर्ता यांना देणेसाठी सभागृहनेता दालनातील दि. 01/01/2020 पासून जावक पत्रांच्या छायांकित प्रती नगरसचिव कार्यालयास विनाविलंब देण्यात याव्यात.

(वासुदेव शिरवळकर)
अपिलीय अधिकारी तथा
नगरसचिव
मिरा भाईंदर महानगरपालिका

# मिरा भाईंदर महानगरपालिका
## नगरसचिव कार्यालय

दि. 06/04/2021

श्री. कृष्णा सी. गुप्ता यांनी दि. 12/01/2021 रोजी दाखल केलेल्या अर्जावर माहिती माहिती प्राप्त न झाल्याने दि. 22/02/2021 रोजी प्रथम अपिल दाखल केलेले आहे. सदर अपिलीय अर्जावर दि. 06/04/2021 रोजी सकाळी 11.00 वाजता मिरा भाईंदर महानगरपालिका मुख्य कार्यालय, तिसरा मजला, नगरसचिव दालन येथे सुनावणी आयोजित करण्यांत आली असता, सदर सुनावणीस खालील अपिलार्थी / अधिकारी उपस्थित होते.

| अ.क्र. | नांव | सही |
|---|---|---|
| 1 | श्री./श्रीम. वासुदेव शिरवळकर नगरसचिव | [signature] |
| 2 | श्री./श्रीम. कैलास दा. म्हात्रे जनमाहिती अधिकारी | [signature] |
| 3 | श्री./श्रीम. ---------------------------------------- | |

मिरा भाईदर महानगरपालिका
जा.क्र.माअधि/अपिल/01/2017
प्रथम अपिलीय अधिकारी तथा नगरसचिव
मिरा भाईदर महानगरपालिका.
दि. 06/04/2021

**प्रथम अपिलिय अधिकारी तथा नगरसचिव मिरा भाईदर महानगरपालिका यांचेसमोर माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19(1) अंतर्गत दाखल झालेले प्रथम अपील**

श्री. कृष्णा सी. गुप्ता ...... अपिलार्थी
शॉप 106/सी, पटाडीया कॉम्पलेक्स,
उत्तन रोड, गांधी नगर, जनार्दन रकवी मार्ग,
भाईंदर (प.)

विरूध्द

जनमाहिती अधिकारी ...... प्रतिवादी
नगरसचिव विभाग
मिरा भाईदर महानगरपालिका

:- विवेचन :-

अपिलार्थी श्री. कृष्णा सी. गुप्ता शॉप 106/सी, पटाडीया कॉम्पलेक्स, उत्तन रोड, गांधी नगर, जनार्दन रकवी मार्ग, भाईंदर (प.) यांनी माहितीचा अधिकार अधिनियम 2005 नुसार जन माहिती अधिकारी, यांचेकडे दि. 12/01/2021 रोजीच्या अर्जान्वये खालील माहिती मिळणेबाबत अर्ज सादर केला.

**अपिलार्थी यांनी मागितलेल्या माहितीचा तपशिल :-**

श्री. प्रशांत दळवी, सभागृहनेता यांचे दालनातुन अग्रेषित केलेल्या पत्रांच्या प्रतींची मागणी केली आहे.

**अपिल दाखल करण्याचे कारणे :-**

पत्रांच्या प्रती प्राप्त न झाल्याचे कारण देऊन अपीलार्थी यांनी दि. 22/02/2021 रोजी प्रथम अपिलीय अधिकारी तथा नगरसचिव यांचेकडे प्रथम अपिल दाखल केले आहे.

**सुनावणीचा तपशिल :-**

अपिलार्थी व जन माहिती अधिकारी तथा लिपीक, नगरसचिव विभाग यांना प्रथम अपिलाच्या सुनावणीस दि. 06/04/2021 रोजी सकाळी 11.00 वाजता उपस्थित राहण्याबाबत पत्र क्र. जा.क्र.मनपा/सचिव/मा.अ./अपिल 01/2021, दि. 30/03/2021 अन्वये कळविण्यांत आले. सुनावणीस जनमाहिती अधिकारी, व सहा. जनमाहिती अधिकारी, नगरसचिव विभाग व अपिलार्थी श्री. कृष्णा गुप्ता हजर आहेत.

**अपिलार्थी यांचा सुनावणी दरम्यान युक्तीवाद :-** जनमाहिती अधिकारी यांनी मला श्री. प्रशांत दळवी, सभागृहनेता यांचे दालनातील अग्रेषित पत्रांची नोंद असलेल्या जावक वहीच्या पानांची साक्षांकित प्रती दिलेल्या आहेत. परंतु, सभागृहनेता यांचे दालनातून अग्रेषित केलेल्या पत्रांच्या प्रती दिलेल्या नाहीत.

**अपिलीय अधिकारी यांनी सुनावणी दरम्यान केलेला युक्तीवाद :-** जनमाहिती अधिकारी यांनी आपणांस सभागृहनेता यांचे दालनातील जावक नोंदवहीच्या पानांची साक्षांकित प्रत दिलेली आहे. त्यावरुन आपणांस आवश्यक असलेल्या पत्रांची माहिती कृपया आपण जनमाहिती अधिकारी यांना द्यावी. जेणेकरुन आपणांस पत्रांच्या प्रती उपलब्ध करुन देता येतील.

**अपिलार्थी यांचा सुनावणी दरम्यान युक्तीवाद :-** ठिक आहे.

**-: निर्णय :-**

श्री. कृष्णा सी. गुप्ता ह्यांनी त्यांना सभागृहनेता दालनातील आवश्यक असलेल्या पत्रांची माहिती, जनमाहिती अधिकारी यांना दिलेनंतर जनमाहिती अधिकारी यांनी सदरच्या पत्रांच्या साक्षांकित प्रती अर्जदार यांना विनामुल्य उपलब्ध करुन द्याव्यात.

(वासुदेव शिरवळकर)
अपिलीय अधिकारी तथा प्र. नगरसचिव
मिरा भाईंदर महानगरपालिका

प्रति,

1) माहिती अधिकार अपील नस्ती
प्रथम अपिलीय अधिकारी तथा
नगरसचिव यांचे कार्यालय

2) श्री. कृष्णा सी. गुप्ता
शॉप 106/सी, पटाडीया कॉम्पलेक्स,
उत्तन रोड, गांधी नगर, जनार्दन रकवी मार्ग,
भाईंदर (प.)

3) जनमाहिती अधिकारी तथा उपसचिव
नगरसचिव विभाग
मिरा भाईदर महानगरपालिका

Pc1/Mahiti Adhikar/2017/Apil/Nirnay - Krushna Gupta